बुधवार, दि २८ मे २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ३६ वा ● किंमत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# जालना-नांदेड समृद्धी महामार्गासाठी जमिनीचे फेरमूल्यांकन करुन बाजारभावाच्या पाचपट मावेजा द्या; शेतकऱ्यांचे आंदोलन

### जमीन अधिग्रहणाबाबत पुन्हा सुनावणी होणार आमदार अर्जुन खोतकर यांचे आंदोलकांना आश्वासन

**जालना । प्रतिनिधी -** जालना -नांदेड समृद्धी महामार्गासाठी जमिनीचे फेरमुल्यांकन करून बाजारभावाच्या पाचपट मावेजा द्या या मागणीसाठी मंगळवार (दि २७) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासम ोर लेकरा-बाळांसह आंदोलन केले. दरम्यान आंदोलनस्थळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी भेट देत जमिन अधिग्रहणाबाबत पुन्हा सुनावणी घेण्यात येईल असे आश्वासन आंदोलकर्त्यांना दिले.

गेल्या अनेक महिन्यांपासून शेतकऱ्यांचे देवमुर्ती परिसरात अधिग्रहण आणि जमिनीचे फेरमुल्यांकन करण्याबाबत आंदोलन सुरु होते. सुरुवातीच्या काळात आंदोलकांनी आत्म दहनाचा ईशारा दिल्यानंतर आमदार खोतकरांनी आंदोलनकर्ते आणि प्रशासनात मध्यस्थी पान ३ वर





# जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता

### दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवाम ानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दि.२७ मे व २९ मे २०२५ रोजी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच ३१ मे २०२५ रोजी ढगांच्या गडगडाटासह हलका पाउस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे. वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जम ीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतक-यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहजन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## युवा आदर्श

### विसंगत ...

मान्सूनचे आगमन
अंदाजात विसंगत
आतिथ्यशील सारे
हो सुहास्य स्वागत
नाले सफाई जोरात
उगाचं जाई लांबत
किती उचला गाळ
तुंबाई नाही थांबत
तयार न स्वयंपाक
बसवू ठेवली पंगत
सोहळ्या औचित्य
बेगडीसगळी रंगत
पावसाळी आजार
येती रोग्यास हुंगत
इस्पितळात यंत्रणा
सुस्त पडली खंगत
सुस्तावली वाहतूक
यंत्रणा होई अबर्गत
दोष खरा कुणाचा
वाद सरेना अंतर्गत
धोकादायक इमारत
वाट पाहतेयं खंगत
रहिवासी तिथे तिष्ठत
कारणे बसले सांगत
सिबील स्कोअर अडे
पुरावा बसले मागत
कशा करालं पेरण्या
कर्ज मंजूरी कलागत

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# महाडीबीटी प्रणालीवर अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी व बियाणे बदलाचे महत्व विचारात घेता सुधारित/ संकरीत वाणांचे प्रसाराच्या दृष्टीने प्रमाणित बियाणे वितरणाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. प्रमाणित बियाणे वितरण या घटकांतर्गत आर्थिक सहाय्य प्रति शेतकरी किमान ०.२० हे ते कमाल १ हेक्टरपर्यंत मर्यादित आहे. शेतकऱ्यास या बियाणे पुरवठादार संस्थेच्या वितरकामार्फत ७/१२ उताऱ्याच्या आधारे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावर प्रमाणित बियाणे वितरण करण्यात येणार आहे. तुर, मुग, उडीद १० वर्षाच्या आतील सुधारित प्रमाणित बियाणे वाणास ५० रू किलो प्रमाणे अनुदान असुन १० वर्षाच्या वरील सुधारित प्रमाणित बियाणे वाणास २५ रू किलो प्रम ाणे अनुदान देय राहील. तुर, मुग, उडीद या पिकांच्या अनुदानावरील बियाणेसाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत सोयाबीन बियाणे ५ वर्षाच्या आतील वाण १०० टक्के अनुदानावर उपलब्ध केले जाणार आहे. या साठी महाडीबीटी पोर्टलवर आजपासुन गुरूवारपर्यंत अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. गुरूवारी ज्या शेतकऱ्यांची निवड झालेली आहे त्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर संदेश जातील व यादी प्रसिध्द हाईल. अनुदानावरील बियाणे साठी निवड झालेल्या लाभार्थी शेतकऱ्यांने त्याच्या मोबाईलवरील निवड झालेला संदेश व स्वतःचा आधार कार्ड घेवून आपल्या तालुक्यातील वितरकामार्फत शुक्रवारपासुन बियाणे उचल करावे. तालुकानिहाय वितरकांच्या याद्या गुरूवारी प्रसिध्द केल्या जातील.

त्याचप्रमाणे राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान व राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत पिक प्रात्यक्षिक बाब राबविण्यात येणार असुन पिक प्रात्यक्षिक ही बाब शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषि क्षेत्रात काम करणारी सहकारी संस्था इ. व्दारे राबविण्यात येणार आहे. शेतकरी गट हा ३१ मार्च २०२४ पुर्वी नोंदणीकृत असावा. पिक प्रात्यक्षिकासाठी MahaDBT पोर्टलव्दारे पान ३ वर

# जालन्यात वक्फ कायद्या विरोधात होणार निषेध सभा!

### तहफ़्फ़ुज़ ए अवक़ाफ़ कमिटी जालनाच्या शिष्टमंडळाने घेतली मौलाना उमरैन महफ़ूज रहमानी यांची भेट



**जालना । प्रतिनिधी -** ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे सरचिटणीस मौलाना मुहम्मद उमरैन महफूज रहमानी यांनी छत्रपती संभाजीनगर येथे वक्फ सुधारणा कायद्याविरुद्धच्या सभेला भेट दिली. त्याच दिवशी बैठकीपूर्वी तहफ़्फ़ुज़ ए औकाफ़ कमिटी ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड जालना यांचे एक शिष्टमंडळ मौलाना मुहम्मद उमरैन महफूज रहमानी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन जालन्यात वक्फ कायदा २०२५ च्या विरोधात निषेध जाहीर सभा घेण्याच्या मुद्द्यावर चर्चा केली. मौलाना मुहम्मद उमरैन महफ ूज रहमानी यांनी शिष्टमंडळाची चर्चा ऐकली आणि तहफ़्फ़ुज़ ए औकाफ़ कमिटी ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड, जालन्यातील कामकाज ऐकल्यानंतर आनंद व्यक्त केला आणि त्यांना आश्वासन दिले की जूनच्या अखेरीस जालन्यात वक्फ़ कायद्याविरुद्ध जाहीर सभा आयोजित केली जाईल. यावर जालना शिष्टमंडळाने मौलाना मुहम्मद उमरैन महफ ूज़ रहमानी यांचे आभार मानले आणि मौलाना यांनी लवकरात लवकर निश्चित तारीख द्यावी अशी विनंती केली. या संदर्भात शिष्टमंडळाचे अधिकारी पान ३ वर

# संपादकीय

## शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा!

मुंबईत मान्सूनने जोरदार सलामी दिली आहे. मागील दोन तीन दिवसांपासून मुंबईत चालू असलेल्या पावसाने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडवली. रविवारी तर मुंबईत २९४ मिली पाऊस झाला. तब्बल १०७ वर्षांनंतर मुंबईत मे महिन्यात विक्रमी पाऊस झाला. मुंबईत पावसाने जोरदार हजेरी लावल्याने मुंबई पुन्हा एकदा तुंबली. पाणी तुंबल्यामुळे मुंबईकरांचे अतोनात हाल झाले. जागोजागी गुडघाभर पाणी साचले. रस्त्यांवर देखील पाणी साचले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली. महामार्गावर पाणी आल्याने शेकडो गाड्या जागेवरच थांबल्या त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. रिक्षा, टॅक्सी यांनी जणू अघोषित संप पुकारला. रेल्वे मार्गावर पाणी साचून रूळ पाण्याखाली रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे काही लांब पल्ल्याच्या गाड्या उशिराने धावू लागल्या. लोकलही धीम्या गतीने सोडाव्या लागल्या. लोकांच्या घरात पाणी साचल्याने लोकांचा संसार पाण्याखाली गेला. एकूणच पावसाने मुंबईची चांगलीच दैना उडवली. या पावसाने २६ जुलै २००५ रोजी झालेल्या प्रलयकारी पावसाची आठवण झाली. पावसामुळे मुंबईची दैना झाल्यावर नेहमीप्रमाणे दोषारोपांची मालिका सुरू झाली. सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोपांच्या फैऱ्या झाडू लागले. मोठ्या पावसाने मुंबईची दैना का झाली याला जबाबदार कोण ? यावर राजकारण सुरू झाले ; पण मोठ्या पावसानंतर मुंबईची दैना का होते ? पाऊस वाढला की मुंबईची तुंबई का होते ? या प्रश्नाकडे मात्र सर्वच पक्ष सोईस्कर डोळेझाक करीत आहेत. २६ जुलैच्या पावसानंतर शासन, प्रशासन आणि नागरिकांनीही कोणताच धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. पूर्वी मुंबईत मोकळ्या जागा असायच्या त्यामुळे तिथे पाण्याचा निचरा व्हायचा. पण आता मुंबईत मोकळ्या जागाच राहिल्या नाहीत. विकासाच्या नावाखाली मुंबई सिमेंटचे जंगल बनले आहे. मुंबईतील रस्तेही सिमेंटचे आणि पेव्हर ब्लॉकचे बनले आहे त्यामुळे पाणी मुरायला मुंबईत जागाच नसते. त्यात मोठा पाऊस आणि भरती एकाच वेळी आली तर ते सर्व पाणी नागरी वस्तीतच शिरते. मुंबई तुंबण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्लास्टिक ! राज्य सरकारने प्लास्टिकवर बंदी घातली असली तरी मुंबईत दररोज हजारो टण प्लास्टिक कचरा जमा होतो. या प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. हे प्लास्टिक नदी, नाल्यामध्ये अडकल्याने तेथून पावसाचे पाणी वाहत जाण्यास अडचण निर्माण होते. राज्य सरकारने प्लास्टिकवर घातलेली बंदी किती योग्य आहे हे या पावसामुळे तरी नागरिकांना समजेल. नागरिकांनीही प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. यासोबतच नागरिकांनी वाटेल तिथे कचरा टाकायची सवयही मोडायला हवी. ग्लोबल वॉर्मिंगमुळे दरवर्षी मुंबईच्या समुद्र पातळीत वाढ होतेय. मुंबई तुंबण्याचे हे ही एक कारण आहे. पावसामुळे केवळ मुंबईचीच नाही तर सर्वच मोठ्या शहरांची अशीच अवस्था होते. मागील वर्षी दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे दिल्ली जलमय झाल्याचे आपण पाहिलेच आहे. पाच वर्षापुर्वी राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराचीही पावसामुळे दैना झाली होती. मुसळधार पावसामुळे नागपूर शहर पाण्याखाली गेले होते. त्यावेळी विधिमंडळाचे अधिवेशन नागपुरात सुरू होते. इतका पाऊस झाला की पावसाचे पाणी थेट विधान भवनात शिरले होते. त्यामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करावे लागले. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची नामुष्की सरकारवर आली होती. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची इतिहासातील ती पहिलीच वेळ होती. मागील काही वर्षात पावसामुळे पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली ही शहरे जलमय झाल्याचे आपण पाहिले आहे. राज्यातील सर्वच शहरात कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती आहे. पाऊसही बेभरवशाचा झाला आहे. पूर्वीसारखा पावसाचा देखील अंदाज येत नाही. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन तासात येऊन दोन महिन्यांची सरासरी गाठतो. आता हेच पहा ना यावर्षी मे महिन्यातच पावसाने धुमाकूळ घातला आहे. मे महिन्यातील पावसाने आजवरचे सर्व रेकॉर्ड तोडून टाकले आहेत. मे महिन्यात असा इतका पाऊस यापूर्वी कधीही झाला नव्हता. या सर्व परिस्थितीचा विचार करता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली यासारख्या मोठ्या शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे. जलव्यवस्थापनाची आजची पद्धत बदलून नवीन पद्धतीचा अवलंब करायला हवा. त्यासाठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. त्यासाठी परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. परदेशातील जलव्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांना परदेशात पाठवायला हवे. परदेशातील अधिकाऱ्यांची त्यासाठी मदत घ्यायला हवी.

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# स्वातंत्रवीर सावरकर महान देशभक्त

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ साली नाशिक जिल्ह्यातील भागुर येथे झाला. सावरकरांच्या मनात जन्मापासूनच देशभक्तीची भावना ज्वालामुखी सारखी धकधकत होती आणि जसे-जसे सावरकर मोठे होत गेले तसतशी स्वातंत्र्यासाठी मशाल प्रज्वलित होत होती.विर सावरकरांनी लाला लजपतराय,बाळ गंगाधर टिळक व विपिन चंद्र पाल या महान क्रांतिकारक महापुरुषांपासुन प्रेरणा घेऊन आपली वाटचाल सुरू केली आणि क्रांतीचा लढा सुरू ठेवला व कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता भारताला स्वतंत्र मिळावे यासाठी स्वतंत्र लढ्याच्या कुंडात उडी घेतली.१८५७ च्या गनिमी संघर्षाच्या विद्रोहाचा अभ्यास केला.त्यावर आधारित एक पुस्तक लिहिले द हिस्ट्री ऑफ व वॉर ऑफ इंडियन इंडिपेंडन्स नावाच्या या पूस्तकाने इंग्रज प्रशासनाचे धाबे दणाणले. त्यामुळे हे पुस्तक इंग्रजांनी बेकायदेशीर ठरविले.परंतु सावरकरांच्या गनिमी काव्याने बिहारमध्ये हे पुस्तक लोकप्रिय झाले आणि स्वातंत्र्याची ज्वाला धकधकायला लागली.सावरकर आणि त्याचा भाऊ गणेश यांनी भारतीय परिषद कायदा १९०९ च्या विरोधात निदर्शने केली.यावर इंग्रजांनी त्यांना गुन्हेगार ठरविले व अटक वॉरंट जारी केला अटक होवू नये म्हणून सावरकर पॅरिसला गेले.नंतर १९१० मध्ये सावरकरांना इंग्रजांनी पकडले व न्यायालयाने त्यांना दोषी ठरवुन ५० वर्षाची शिक्षा ठोठावली. ४ जुलै १९११ ला काळ्या पाण्याची शिक्षा जाहीर झाली व अंदमान आणि निकोबार येथील सेल्युलर जेलमध्ये टाकण्यात आले. तेथे त्यांच्यावर इंग्रजांकडुन सतत अत्याचार होत होते. परंतु त्यांनी स्वातंत्र्य लढ्याचा धीर सोडला नाही आणि अनेक यातना सहन करीत इंग्रजांना बजाऊन सांगितले की मी जिवंत आहे तोपर्यंत देश स्वतंत्र झालेला आपल्याला दिसेल व आपल्याला भारत सोडून जावे लागेल आणि हे सावरकरांनी सिद्ध करून दाखविले ही महानता सावरकरांमध्ये दिसून येते.सध्याच्या परिस्थितीत देशातील काही राजकीय पुढारी महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह, विद्वेषक व चिथावणी देणारे विधान करतांना दिसतात. ही बाब अत्यंत घृणास्पद व निंदनीय आहे. देशाच्या इतिहासात सावरकरांना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर असे संबोधले जाते.म्हणजेच स्वातंत्र्यवीर ही पदवी पारतंत्र्यातील देशभक्तांनीच दिली ही बाब आक्षेपार्हय विधान करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. स्वातंत्र्पुर्वकाळ अत्यंत खडतर आणि कठीण होता हे सर्वांनाच ठाऊक आहे.त्याकाळी स्वातंत्रवीर सावरकरांच संपूर्ण कुटुंब स्वतंत्र लढ्यात सहभागी होते.महाराष्ट्रात अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष,साधु-संत, समाजसुधारक होवून गेले त्यामुळे महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रत्येक तळागाळातील व्यक्तींनी आपले वेगवेगळ्या पध्दतीने योगदान दिले आहे. तेव्हाच भारत स्वतंत्र झाला.इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले.परंतु देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या जिवाची पर्वा न करता हसत-हसत फासावर सुध्दा चढले ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.सावरकरांचा काळ कसा होता किंवा त्यांनी स्वातंत्र्य लढा कसा उभारला ही बाब त्याकाळातील सहकाऱ्यांना व देशभक्तांनाच ग्यात असावी. परंतु आता सावरकरांच्या कर्तृत्ववावर कोणी राजकीय पुढारी चीखलफेक करीत असेल व आक्षेपार्ह विधान करीत असेल हे योग्य नाही असे मला वाटते.स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना झालेली काळ्यापाण्याची सजा आणि त्यांनी भोगलेल्या यातना यांचा इतिहास संपूर्ण शालेय पुस्तकांमध्ये लिखित आहे आणि हि शालेय पुस्तके आजची नसुन ७८ वर्षे जुनी आहे.या संपूर्ण पुस्तकांमध्ये अनेक विचारवंतांनी, थोरपुरूशांनी सावरकरांच्या कामाची प्रशंसा सुध्दा केली आहे. तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व स्वातंत्रवीर सावरकर नावाने संबोधले जावु लागले. राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की स्वातंत्र्यवीर ही पदवी कोणालाही सहज मिळत नाही त्यासाठी त्याग करावा लागतो आणि सावरकरांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व भारत स्वतंत्र झाला ही बाब त्यांच्यावर टीका करणाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्याकाळी अनेक उतार चढाव होते यात दुमत नाही.परंतु परिस्थिती नुसार प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या पध्दतीने निर्णय घ्यायचे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक सुद्धा होते.यात जहालवादी, मवाळवादी, क्रांतिकारक अशा अनेक विचारधारांचे लोक होते. त्यामुळे आपसात मतभेद अवश्य असायचे परंतु मतभिन्नता नव्हती.त्यामुळे सर्वांचा एकच उद्देश होता तो म्हणजे भारताला इंग्रजांच्या तावडीतून मुक्त करून स्वतंत्र करने त्यापध्दतीने सर्वांनी आपआपले योगदान दिले व भारत १९४७ ला स्वातंत्र्य झाला.यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान होते. सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ मध्ये झाला व त्याचा मृत्यू २६फेब्रुवारी १९६६ ला झाला.आज त्यांचा मृत्यू होऊन ५९ वर्षे झालीत आणि भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालीत मग आताच राजकीय पुढाऱ्यांना कसे काय आठवले की सावरकरांनी इंग्रजांना मदत केली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा इतिहास महाराष्ट्रातील जनतेला, राजकीय पुढाऱ्यांना, पक्ष-विपक्षांना चांगल्या प्रकारे ग्यात आहे. त्यामुळे बाहेरच्या राजकीय पुढाऱ्यांनी महाराष्ट्रातील जनतेला स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल जास्त ग्यान देवु नये. कारण स्व.इंदिरा गांधीसह अनेकांनी सावरकरांचा उल्लेख स्वातंत्र्यवीर सावरकर असा अनेकदा केला आहे ही बाब सावरकरांचा विरोध करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. थोरमहात्मे, क्रांतिकारक,स्वातंतासेनानी किंवा आपले पुर्वज ज्यांच्या कर्तृत्ववामुळे आपण खुला स्वास घेत आहे अशांबद्दल अपशब्द किंवा आक्षेपार्ह विधान निघणार नाही याची काळजी सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी घ्यावी. सरकारला मी आग्रह करेल की स्वातंत्रवीर सावरकर यांच्या बद्दल किंवा आपल्या पुर्वजांबद्दल यानंतर कोणीही आक्षेपार्ह विधान केले तर त्यावर कठोर कारवाई करावी.सध्या देशात विद्वेषी वक्तव्य देण्याचे प्रकार वाढले आहेत.यामुळे सुप्रीम कोर्टाने दिनांक २८ एप्रिल २०२३ ला सुप्रीम कोर्टाने आदेश काढला की विद्वेषी वक्तव्ये करणारे यांची कोणी तक्रार करेल याची वाट न पाहता राज्यांनी कारवाई करावी.त्या कृतीस विलंब झाला तर तो कोर्टाचा अवमान समजला जाईल असे सुप्रीम कोर्टाने आपल्या आदेशात बजावले आहे.त्यामुळे विद्वेषी वक्तव्ये करणाऱ्यांनी आपल्या जिभेवर आवर घालावा. जोपर्यंत सुर्य -चंद्र-तारे-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत सावरकरांचे व संपूर्ण देशभक्तांचे नाव देशात स्वाभिमानाने घेतले जाईल. स्वातंत्र्यवीर सावरकरांना जयंती निमित्त माझा कोटी कोटी प्रणाम!जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## वाचकांचे मनोगत

### सिंदूर मोहिम; दोन महिला सैन्य अधिकाऱ्यांचा विसर पडला ?

पाकिस्तानातील दहशतवाद्यांनी काश्मीर मधील पहलगाम येथील पर्यटनस्थळी २६ निरपराध हिंदूंना त्यांच्या कुटुंबियांसमोर धर्म विचारुन ठार केले. त्याचा बदला म्हणून भारताने पाकिस्तानातील ९ दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले.त्यात १०० दहशतवाद्यांना कंठस्नान घातले भारतीय मोहिमेत सैन्य दलातील दोन अधिकारी महिला होत्या .मोहिम यशस्वी झाल्यानंतर काही टिकाकारांनी सोफिया कुरेशी व व्योमिका सिंग आणि विदेश सचिव विक्रम मिस्त्री यांच्या बद्दल अतिशय गलिच्छ शब्दात टीका - टिपणी केली. भारतीय पर्यटकांच्या पत्नींचे कुंकू पुसले म्हणून मोहिमेचे नामकरण ' सिंदूर मोहिम 'ठेवण्यात आले.भारतीय सैन्य दलातील दोन महिला अधिकार्यांनी मोहिमेत यशस्वी केली त्यांच्यावर टिका टिपणी करणारे कोणी सामान्य व्यक्ती नाहीत तर ते उच्च पदावरील लोकप्रतिनिधी,राजकीय नेते आहेत. मध्य प्रदेशचे मंत्री विजय शहा ,उप मुख्यमंत्री जगदीश देवडा यांनी यशस्वी मोहिमेचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आहे असे कौतुक केले आहे.तर समाजवादी पक्षाचे राज्यसभा खासदार राम गोपाल यादव यांनीही व्योमिका सिंग व सोफिया कुरशी यांच्या बद्दल गरळ ओकली आहे.सैन्य दलातील दोन महिला अधिकारी ' सिंदूर ' वापरत नाहीत काय ? एका बाजुला सिंदूर ऑपरेशन यशस्वी केले म्हणून देशभरात प्रभातफेर्यांचे आयोजन तर दुसरीकडे यांनी मोहिमेत यशस्वी केली त्यांच्या बद्दलच वाईट बोलायचे ही कुठली मानसिकता. वरिष्ठ नेत्यांची आपल्यावर मर्जी राहावी म्हणून केलेली बेताल वक्तव्य आहेत याला लगाम कोण घालणार ?

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई,**
**९८६९४७६२०९,** mahadeogolvaskargmail.com

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

## पान १ वरुन

### जालना - नांदेड ...

केली होती. व महिना भराचा वेळ प्रशासनाला निर्णय घेण्यासाठी दिला होता मात्र, ही म ध्यस्थी फळाला आली नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न न सुटल्यामुळे शेतकऱ्यांनी पुन्हा आंदोलनाचा ईशारा देत देवमुर्ती परिसरात आंदोलन सुरु केले होते. मंगळवार (दि २७) आंदोलनकर्त्यांनी आपल्या लेकरां-बाळांसह जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. आता पुन्हा आमदार खोतकर यांनी आंदोलनकर्त्यांना शब्द दिला असून पुन्हा सुनावणी होण्यास जिल्हाधिकारी यांनी मान्य केल्याचे आ. खोतकर यांनी म्हंटले आहे. पुन्हा सुनावणी होऊन शेतकऱ्यांच्या समस्या सुटतील अशी अपेक्षाही यावेळी खोतकर यांनी व्यक्त केली. सरकार आणि प्रशासनाकडून मागण्या मान्य न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन गनिमी कावा पद्धतीने आत्मदहन आंदोलन करु असा ईशारा यावेळी शेतकऱ्यांनी दिला आहे. आंदोलना दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात होता.


### महाडीबीटी ...

नोंदणीकृत शेतकरी गट / कंपनी / संस्था निवड ही प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर निवड करण्यात येणार आहे. एका गावातून फक्त एकाच शेतकरी गटाची निवड करण्यात येणार असुन गटातील शेतकऱ्यांची संख्या जास्त असल्यास त्यापैकी फक्त २५ शेतकऱ्यांची या लाभासाठी निवड करावयाची आहे तथापि शेतकरी गटातील एका कुटुंबातील एकच शेतकऱ्यास लाभ देण्यात येणार आहे. शेतकरी गट / कंपनी / संस्था यामधील शेतकऱ्यांना पिक प्रात्यक्षिकाचा लाभ देताना सीआीरलझ वर नोंदणी असणे बंधनकारक आहे.

तरी वरील सर्व बाबींचा लाभ घेणेसाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी / शेतकरी गट / कंपनी आणि संस्था यांनी mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि.२९.०५.२०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत व अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले

### जालन्यात वक्फ ...

मौलाना मुहम्मद उमरैन महफुज़ रहमानी यांच्याशी संपर्कात राहतील. तहफुज़ ए औकाफ़ कमिटी ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड जालनाचया शिष्टमंडळात मुफ्ती अब्दुल रहमान नायगावी काजी ए शरियत जालना, मौलाना सय्यद नसरुल्ला हुसैनी सोहेल नदवी नकीब अमारात ए शरिया जालना, शेख मुजीब सेक्रेटरी जमात-ए-इस्लामी महाराष्ट्र, फिरोज अली मुस्लीम विकास परिषद, लियाक़त अली खान यासिर, वाहदत-ए-इस्लामी हिंद जालना, सय्यद शाकीर नाजीम जिल्हा जमात-ए-इस्लामी हिंद जालना, असदुल्ला रिझवी एसडीपीआय जालना उपस्थित होते.



भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हाध्यक्ष पदी भास्कर दानवे यांची नियुक्ती झाल्याबद्दल नारीयलवाले परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित भाजपाचे नविन जालना मंडल अध्यक्ष सुनिल खरे, सोमेश काबलिये, सुनील पवार, सेवकराम नारियलवाले आदींची उपस्थिती होती.

## जालना जिल्हयात दाखला आपल्या दारी या उपक्रमास प्रतिसाद



**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याची अंमलबजावणी होणे करीता इयत्ताद १० वी उतीर्ण विद्यार्थ्यांकरीता पुढील प्रवेशासाठी लागणारे आवश्यक प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना विहीत वेळेत मि ळावे याकरीता दाखला आपल्यात दारी हा उपक्रम राबवित असताना दिनांक २६ मे २०२५ रोजी जालना जिल्ह्यातील विविध माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत एकूण ८२ ठिकाणी शिबीर आयोजित करण्याळत आले असुन इयत्ता १० वी उतीर्ण विद्यार्थ्यांचे एकूण २२४२ अर्ज प्राप्त झाले आहेत.जास्तीत -जास्त प्रमाणात इयत्ताइ १० वी उतीर्ण विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. श्री श्रीकृष्ण पांचाळ जिल्हाधिकारी जालना यांनी केले आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विविधांगी योगदान

**स्वातंत्र्यवीर सावरकर यांची आज २८ मे रोजी जयंती आहे. त्यानिमित्ताने त्यांनी समाजाच्या प्रगतीसाठी दिलेले विविधांगी योगदान सांगणारा हा विशेष लेख. स्वातंत्र्यवीर सावरकरांना विनम्र अभिवादन!**

**– संपादक**

महान क्रांतिकारक, थोर विचारवंत, लेखक, नाटककार, कवी, पत्रकार, समाज सुधारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म दिनांक २८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे झाला. तर २३ दिवस प्रयोपवेशन करून त्यांनी दिनांक २६ फेब्रुवारी १९६६ रोजी मुंबईत आत्मार्पण केले.

काळ जससजा पुढे जात आहे, तसतसे सावरकरांचे विचार, कार्य यांची आपल्याला किती गरज आहे हे,तीव्रतेने जाणवत आहे .यामुळेच देशविदेशात सावरकर सम्मेलन आयोजित होत आहेत, ही अत्यंत आवश्यक आणि अभिमानाची बाब आहे. सुदैवाने २८ मे २०१७ रोजी ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे झालेल्या चौथ्या विश्व सावरकर संमेलनास आणि २८ मे २०२० रोजी नवी दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय सावरकर संमेलनास उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली.

सिडनी येथील संमेलनात माझे स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता या विषयावर तर दिल्ली येथील संमेलनात स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सामाजिक समतेत योगदान या विषयावर व्याख्यान झाले.परंतु जसजसा सावरकरांच्या जीवनाचा, विचारांचा, साहित्याचा आपण अभ्यास करू लागतो,तसतसे त्यांनी विविध क्षेत्रात दिलेले योगदान पाहून आपण विस्मयचकित होतो. एकच व्यक्ती एका जीवनात, त्यातील काही वर्षे भयंकर अशा तुरुंगवासात घालवावी लागलेली असूनही इतके मोठे कार्य करू शकते हे पाहून आपण नत मस्तक होतो. सावरकरांच्या अशाच विविधांगी योगदानाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न येथे करीत आहे.

ब्रिटीश सरकारने क्रांतिवीर मदनलाल धिंग्रा यांना दिलेल्या फाशीच्या शिक्षेचा सूड घेण्यासाठी अनंत कान्हेरे या निधड्या छातीच्या तरुणाने नाशिकचा कलेक्टर ए एम टी जॅक्सन याला २१ डिसेंबर १९०९ रोजी गोळी घालून ठार मारले.या प्रकरणात सावरकरांवर ३८ दोषारोप ठेवुन त्याना जन्मठेप झाली.

४ जुलै १९११ पासून सावरकारांची अंदमान कारागृहात शिक्षा सुरू झाली. तिथे त्यांचा अनन्वित छळ होऊ लागला. पण गप्प बसतील, ते सावरकर कसले ? तिथेही त्यांनी आपले कार्य सुरु केले.

**साक्षरता प्रसार**

कैद्यांमधील अज्ञान पाहून सावरकरांना त्यांना साक्षर करणे महत्वाचे वाटू लागले. त्यामुळे त्यांनी तुरुंगात कैद्यांना साक्षर करण्याचे कार्य हाती घेतले.त्यामुळे अनेक कैदी साक्षर होऊन त्यांना कारकुनाच्या जागा मिळाल्या. अक्षरज्ञान करून घेतल्यामुळे जेव्हा कैद्यांना वृत्तपत्र वाचता येऊ लागले,तेव्हा त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

साक्षरतेबरोबरच सावरकरांनी कारागृहात ग्रंथालय उभारणी सुरू केली.जेव्हा त्यांनी अंदमान सोडले,तेव्हा तिथे दोन हजार ग्रंथ जमा झाले होते!.



**कारागृहातुन पत्रकारिता**

नाशिक येथे शाळेत असतानाच सावरकरांनी पत्रकारिता सुरू केली होती. पुढे पुणे, मुंबई, लंडन येथे शिकत असताना देखील ते पत्रकारितेच्या म ध्यमातून स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग चेतवीत होते.

पुढे अंदमान च्या कारागृहात शारीरिक, मानसिक कष्ट, हाल अपेष्टा,अतोनात छळ होऊनही सावरकर खचले नाहीत. त्याही परिस्थितीत त्यांनी गुप्तपणे पत्रकारिता सुरूच ठेवली. क्रांतिकारक इंदूभूषण व उल्हासकर यांचा छळ आणि हौतात्म्य याविषयीचे थरारक वृत्तांत भारतीय वृत्तपत्रांमधून त्यांनी प्रसिद्ध केले. त्यामुळे इंग्रज अधिकारी हादरले. वृत्तपत्रातून झालेली टिका, मध्यवर्ती मंडळात विचारले गेलेले प्रश्न,लोकमताचे वाढते दडपण,या सर्वांचा सरकारवर प्रचंड दबाव आला. शेवटी १९१३ साली सर रेजिनाल्ड क्रडॉल यांनी अंदमानच्या कारागृहाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.ते कैद्यांशी बोलले.सावरकरांचीही त्यांनी भेट घेतली.या सर्वांचा परिणाम होऊन अंदमानच्या यम पुरीतील छळ आणि निर्बंध किंचितसे सैल झाले.

**अस्पृश्यता निर्मूलन**

अंदमान कारागृहातून सावरकरांना रत्नागिरी येथील कारागृहात हलविण्यात आले. जाती व्यवस्थेमुळे हिंदू एक होऊ शकत नाही,हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे अस्पृश्यता निर्मुलन,जातीप्रथा निर्मूलन यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले.यासाठी विविध कार्यक्रम हाती घेतले.२२ फेब्रुवारी १९३१ रोजी सर्वांना खुले असणाऱ्या रत्नागिरीतील पतित पावन मंदिराचे उद्घाटन झाले . आचार्य,शंकराचार्य,पंडित, देशभक्त यांनी जाहीर केले की,आता रत्नागिरी हे एक तीर्थक्षेत्र बनले आहे. एक वक्ते म्हणाले, रत्नागिरी ही नवजागृत, शुद्धीकृत ,एकीकृत हिंदू जगताची नवं काशी ठरली आहे. खरोखरच पतितपावन मंदिर हे अखिल भारतीय हिंदू चळवळीचे विद्यापीठ बनले होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जनता पत्राने सावरकरांनी केलेल्या उपदेशाला पाठिंबा दिला. त्याआधी काही दिवस सावरकरांनी एक पत्रक काढून, डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी नासिक येथे चालविलेल्या मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहाला आपला पाठींबा जाहीर केला होता.दलित वर्गाच्या हिंदूंना काळाराम मंदिर उघडे करा अशी नासिकच्या सवर्ण हिंदूंना सावरकरांनी त्या पत्रकाद्वारे आवाहन केले होते. भाऊराव गायकवाड यांनी नासिकच्या सवर्ण हिंदूंमध्ये ते पत्रक वाटले होते. मी जर आज मोकळा असतो तर नासिकच्या सत्याग्रहात भाग घेऊन पहिल्या प्रथम तुरुंगात गेलो असतो. असे सावरकरांनी या पत्रकात म्हटले होते.

**विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन**

सावरकरांचा दृष्टिकोन सम्पूर्णतः विज्ञाननिष्ठ होता. मानवाला जे साधक ते चांगले आणि जे बाधक ते वाईट , अशी त्यांची विचार सरणी होती. यंत्र हा शाप नसून मानवाला मिळालेले वरदान आहे, बेकारी हा यंत्राचा दोष नसून तो विषम वाटणीचा आहे, असे प्रतिपादन ते कटाक्षाने करीत.

एका लेखात सावरकरांनी निरीश्वरवादी रशियाच्या अंतराळ प्रगतीचे वर्णन करून विज्ञानाची कास धरण्याचे कळकळीचे आवाहन हिंदूना केले आहे. मानव अहितासाठी नव्हे तर मानव हितासाठी विज्ञानाचा उपयोग करण्याचे उद्दिष्ट मनुष्याने ठेवले तर विज्ञान हे वरदान ठरेल,असा निष्कर्ष त्यांनी काढला होता.

**लिपी सुधारणा**

लिपी सुधारणा,पंचांग सुधारणा याहीकडे सावरकरांनी लक्ष दिले होते.या विषयांवर त्यांनी अनेक लेख लिहिले,पुस्तके प्रकाशित केली. सावरकरांनी छापखान्यातील नागरी टंकांची संख्या २५० वरून ८० वर आणुन दाखविली होती.ही सर्वाधिक शास्त्रीय लिपी आहे,असे मुंबईच्या एका सभेत त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय पंचांग आवश्यकता या विषयावर सावरकरांनी केसरी वृत्तपत्रात दोन लेख लिहिले होते. सावरकरांनी अनेक इंग्रजी शब्दांना समर्पक मराठी शब्द सुचविले आणि ते प्रचारात आणले. हे सर्व शब्द आज रूढ झाले आहेत. त्यातील काही शब्द म्हणजे, मेयरला महापौर, बजेट'ला अर्थसंकल्प, टेलीप्रिंटर दूरमुद्रक इत्यादि.

**आत्मार्पण; सावरकरांची प्रकृती**

१९६६ सालच्या प्रारंभी विकोपाला गेली. त्यांनी औषध सोडले. पचनक्रिया बिघडल्याने अन्न वर्ज्य केले .आधार घेऊन ते उठू शकत.त्यांना वेदना सहन होत नव्हत्या. केव्हा एकदा मृत्यू येईल,असे त्यांना झाले होते.दृष्टीसमोर तरळणाऱ्या अंतकाळाची सूचक कल्पना मांडताना त्यांनी एका लेखात लिहिले होते, अत्यंत असमाधानाने, विफलतेच्या तीव्र जाणिवेने, संकटाना कंटाळून ,इच्छा असतानाही सुखाने जगता येत नाही म्हणून, अत्यंत अतृप्त अशा मनस्थितीत,वैतागाच्या भरात जे जीव देतात, त्यांच्या त्या कृत्याला साधारणतः आत्महत्या म्हटले जाते. पण आपले जीवितकार्य सफल झाल्याने, आपल्या ऐहिक अस्तित्वाची हर्षभराने समाप्ती करतात, त्यांच्या या कृत्यास आत्मार्पण म्हणतात.

सावरकरांनी आपल्या विचारांना जागून आत्मार्पण करण्याचा निर्धार केला. ३ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांनी उपोषण सुरू केले.ते २३ दिवस चालले. शेवटी २६ फेब्रुवारी १९६६ रोजी सकाळी ११ वाजता ,वयाच्या ८३व्या वर्षी स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपला देह मृत्यूला अर्पण केला. भारतम तेच्या या महान, कणखर, प्रखर देशभक्त सुपुत्रास शतशः नमन.

**-देवेंद्र भुजबळ.**
**९८६९४८४८००**

# महावितरणमध्ये बेशरम व कंदीलाचे तोरण बांधून मराठा महासंघाचे लक्षवेधी आंदोलन

## जनतेला अंधारात ठेवणाऱ्यांना आता जागे केल्याशिवाय राहणार नाही-अरविंद देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** गेल्या काही दिवसांपासून पाऊस असो की नसो खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे जालना शहर व परिसरातील नागरिकांची झोप उडाली असून, त्यांना मरणयातना सहन कराव्या लागत आहेत. शिवसेनेच्या दोन्ही गटांनी महावितरणला निवेदने दिली, मात्र, अधिकाऱ्यांच्या डोक्यात प्रकाश पडलाच नाही. विजेचे रडगाणे सुरूच असल्याने हतबल झालेल्या नागरिकांच्या व्यथा आणि संतापाला आवाज देत मराठा महासंघाने जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वात आज सोमवार दि. २६ मे रोजी आक्रमक भूमिका घेऊन म हावितरणच्या कार्यकारी अभियंत्याच्या कार्यालयाला 'कंदील व बेशरमाच्या पानाचे तोरण' बांधून निष्क्रियतेचा निषेध नोंदवला. घोषणाबाजीसह अचानक झालेल्या या लक्षवेधी आंदोलनामुळे म हावितरणचे प्रशासन हादरून गेले.

जालना शहर व परिसरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. २१ मे रोजी रात्री ९ पासून तब्बल अडीच वाजेपर्यंत संपूर्ण शहर अंधारात होते, तर त्याआधी तब्बल २० तास वीजपुरवठा खंडित होता. त्यानंतरही दिवस रात्र खंडित वीज विजपुरवठ्याचा खेळ सुरू असल्यामुळे मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कोषाध्यक्ष अशोक पडुळ, उपाध्यक्ष सुभाष चव्हाण मंगेश मोरे, सागर पाटील, अर्जुन गायकवाड, श्रीधर पोथरे, योगेश सोळंके, दत्ता गव्हाणे, यश जाधव, सुहास मुंडे यांच्यासह कार्यकर्त्यांनी महावितरणचे कार्यालय गाठले आणि निदर्शने करत कार्यकारी अभियंत्याच्या कार्यालयाला बिसराम ाची पाने व कंदीलाचे तोरण लावले. याप्रसंगी बेशरमाचे पाने व कंदीलाचा गुच्छ कार्यकारी अभियंता देण्यात आला. अचानक झालेले हे आंदोलन केवळ लक्षवेधी नव्हे, तर प्रशासनाला हादरवणारे ठरले. आंदोलनाचे गांभीर्य ओळखून पोलीस तात्काळ दाखल झाले. जिल्हा विशेष शाखेचे मुकेश पट्टे, सय्यद शौकत आणि पोलीस कर्मचारी परिस्थितीवर लक्ष ठेवून होते.

यावेळी अरविंद देशमुख यांनी कार्यकारी अभियंत्यास खडेबोल सुनावले. जनतेला अंधारात ठेवणाऱ्यांना आता



जागं केल्याशिवाय राहणार नाही, असे ते म्हणाले. महावितरणच्या गलथानपणाम ुळे जालना अंधारात बुडालं आहे. ही लाजिरवाणी बाब असून, नागरिकांचा अंत पाहू नका. वेळेत दुरुस्ती, झाडांची छाटणी न करता तुम्ही जनतेला त्रास देत आहात. आता आमचा संयम सुटला आहे. परिस्थिती सुधारली नाही, तर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडू. मग जबाबदार कोण, हे जनता ठरवेल, अशा संतप्त शब्दांत अरविंद देशमुख यांनी इशारा दिला.

## सौ. रसना देहेडकर हिरकणी पुरस्काराने सन्मानीत




**जालना । प्रतिनिधी -** उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्त्या सौ. रसना रमेश देहुडकर यांना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते हिरकणी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जालना महानगर पालिका आयुक्त श्री संतोष खांडेकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक सिध्दार्थ माने, शाहीर अप्पासाहेब उगले, डॉ. हर्षदा बागल, उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष सौ. करुणा मोरे यांची उपस्थित होती.

### समाजसेवेच्या आदर्शांचा गौरव

## अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त जिल्हाभरात जनजागृती कार्यक्रम - दानवे

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाड्याच्या भूम ीवर गौरवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त जालना जिल्ह्यात २१ मे ते ३१ मे २०२५ दरम्यान विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या जयंती महोत्सवात संपूर्ण जिल्हाभरात लोकसहभाग वाढवण्यासाठी आणि अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सर्वांनी कार्यक्रम ात सहभावी व्हावे असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

यामध्ये निबंध व रांगोळी स्पर्धा दिनांक: २८ मे २०२५ रोजी दुपारी ३ ते ५ दरम्यान बालाजी मंदिर, कचेरी रोड येथे असणार आहे, सहभागासाठी सौ. संध्याताई देठे ९४२२२६९५५५, सौ.शुभांगीताई देशपांडे ९०२१३३७२८६, सौ.अरुणाताई जाधव ८९९९७३४८३४ यांच्याशी संपर्क करावा.

मंदिर स्वच्छता, महाआरती, वेदपठन व भक्तिगीत दिनांक: २८ मे रोजी श्रीराम मंदिर, पलंगबावडी, जुना जालना व २९ मे जोगेश्वरी माता मंदिर, पाहेगाव या ठिकाणी करण्यात येणार आहे.

नाटक, पथनाट्य, चित्ररथ प्रदर्शन हे दिनांक: २८ मे सकाळी १०.०० वा सावरकर चौक, गांधी चमन चौक येथे होणार आहे.

महिला मेळावा (अहिल्यादेवी वेशभूषेत मिरवणूक) दिनांक: ३१ मे रोजी सकाळी १०.०० वा अमृतेश्वर महादेव मंदिर ते बालाजी मंदिर दरम्यान करण्यात येणार आहे.

वकृत्व स्पर्धा दिनांक : ३० मे रोजी, भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे होणार आहे, या उपक्रमांबाबत अधिक माहिती आणि सहभागासाठी प्रा.राजेंद्र भोसले ९४२२९९२५५५ यांच्याशी संपर्क साधावा.

महिला मॅरेथॉन दिनांक: ३१ मे सकाळी ६.०० वा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून होणार आहे.

बुद्धिजीवी संमेलन दिनांक: ३१ मे रोजी सायं. ५.०० वा भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे होणार आहे.

या कार्यक्रमांच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी आपल्या जीवनकार्याद्वारे समाजास दिलेल्या मूल्यांचा जागर करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रम ांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून ऐतिहासिक जयंती महोत्सवात योगदान द्यावे, असे आवाहन सौ. संध्याताई देठे, सौ. शुभांगीताई देशपांडे, सौ. अरुणाताई जाधव, श्री. कपिल दहेकर, श्री. तुळजेश चौधरी, श्री. सुनिल खरे, श्री. महेश निकम, श्री. संजय डोंगरे, श्री. अमोल धानुरे, श्री. कृष्णा गायके, श्री. कृष्णा लिंगसे श्री. कैलास सचदेव, सौ. रश्मी टेकवाणी, सौ. रेखा टेकवाणी, श्री. सतीशचंद्र प्रभू, श्री. विकास कदम, श्री. म नोज बिडकर आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.







